# डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे जीपॅट व गेट परीक्षेत दैदिप्यमान यश

**जयसिंगपूर/रयत सारथी वृत्तसेवा**



जयसिंगपूर येथील डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील जीपॅट-२०२६ (ग्रॅज्युएट फार्मसी अॅप्टिट्यूड टेस्ट) व गेट (ग्रॅज्युएट अॅप्टिट्यूड टेस्ट इन इंजिनिअरिंग) परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवून महाविद्यालयाचा गौरव वाढविला आहे.

महाविद्यालयातील कु. प्रणाली भेंडूलकर (एआयआर रँक ११४५), कु. अनिश लड्डा (एआयआर रँक ३०००), कु. वैष्णवी धुमाळ (एआयआर रँक ४२५२), कु. प्रतिक लोखंडे (एआयआर रँक ५६०८), कु. अपूर्वा भंडारे (एआयआर रँक ७३८९) व कु. स्वप्ना पाटील (एआयआर रँक २६९१३) यांनी जीपॅट-2026 परीक्षा तसेच कु. प्रतिक लोखंडे याने गेट परीक्षेत १९५ गुण मिळवत आपल्या गुणवत्तेची छाप पाडली.

ही परीक्षा यावर्षी मार्च महिन्यात घेण्यात आली होती व नुकताच तिचा निकाल जाहीर झाला आहे. भारतामध्ये उच्च शिक्षणासाठी जीपॅट व गेट या परीक्षा अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. या परीक्षांमध्ये यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना देशातील नामांकित राष्ट्रीय शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळण्याबरोबरच उच्च शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध होतात. विशेषतः जीपॅट उत्तीर्ण विद्यार्थ्यांना एम. फार्मसी अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळतो तसेच सुमारे ३ लाख रुपयांची शिष्यवृत्ती मिळण्याची संधी देखील प्राप्त होते.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामागे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शितलकुमार पाटील, उपप्राचार्य डॉ. सतीश किलजे तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन समितीचे समन्वयक प्रा. शुभम पाटील व इतर सर्व प्राध्यापक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी या कठीण स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळवले आहे.

या यशाबद्दल डॉ. जे. जे. मगदूम संस्थेचे चेअरमन डॉ. विजय मगदूम व व्हाईस-चेअरपर्सन अॅड. डॉ. सोनाली मगदूम यांनी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांचा सत्कार केला व त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर डॉ. सुनिल आडमुठे, प्राचार्य डॉ. शितलकुमार पाटील, उपप्राचार्य डॉ. सतीश किलजे व प्रा. शुभम पाटील उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशामुळे डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेजच्या शैक्षणिक परंपरेला अधिक बळकटी मिळाली असून, संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.